**नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पांतर्गत दिनांक 12 मे २०२० रोजी कृषि ताई परिसंवाद ( वेबिनार )**
**कार्यक्रमात विचारण्यात आलेले प्रश्न व त्यांची उत्तरे**

| अ.क्र. | प्रश्न विचारणाऱ्या चे नाव | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|---|
| १ | अनंत मिसाळ | कृषी मित्र आणि कृषीताई चा पगार वाढवा. | कृषी मित्र व कृषीताई यांना पगार नसून प्रकल्पासाठी केलेल्या खर्चाचा मोबदला दिला जातो. सदर मोबदला हे केंद्र/राज्य शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार निश्चित केले जाते. |
| २ | ज्योती शंकर नागरे, कृषी ताई, करजगाव | पोखरा योजनाचा खुप फायदा तो लोकांपर्यंत पोहचवणे आहे. | कृषी ताई हि ग्राम कृषी संजीवनी समिती चे सदस्य आहेत, प्रकल्पांतर्गत विविध लाभांच्या अंमलबजावणी करिता त्यांनी सदर लाभ लाभार्त्यापर्यंत पोहोचण्यासाठी प्रयत्न करावेत. |
| ३ | गोपाल चोपडे | सारोळा पीर, तालुका मोताळा, जिल्हा बुलढाणा, या गावासाठी 385 अर्ज असून मात्र 3 शेतकऱ्यांना लाभ मिळाला आहे. कृपया उत्तर अपेक्षित. | ग्राम कृषी संजीवनी समितीच्या बैठकीत विचार मांडून, कृषी सहाय्यक व समुहा सहाय्यक यांच्याशी संपर्क साधावा. |
| ४ | दोनगर महादेव कृषीताई, जाटनांदुर ता. शिरुर बीड | सर, कृषीताईचे मानधन मिळाले नाही. | कृपया याबाबत आपण संबधित ग्राम कृषी संजीवनी समितीशी संपर्क साधावा. प्रकल्प स्तरावरूनही याबाबत उपविभागीय कृषि अधिकारी यांना सूचना देण्यात येत आहेत. |
| ५ | राम कोकाटे | सौ. कमल एकनाथ कोकाटे, मु. मोरगवहाण पो. भर जॅहागिर ता. रिसोड जि. वाशिम कृषी ताई यांना मानधन मिळत नाही तरी कृषी मंत्री साहेबानी दखल घावी. | |
| ६ | संतोष पाटील | मी वैशाली संतोष सूर्यवंशी रा.गोसाविवाडी (डोंजा) ता. परांडा जि. उस्मानाबाद येथील कृषी ताई म्हणून माझी निवड झालेली आहे तरी मला आणखीन मानधन मिळाले नाही आणि ते कधी पर्यंत भेटल? | |
| ८ | बाळाजी सोनावणे | शेतकऱ्याची कागदपत्राची बेजारी कमी करा. | ग्राम कृषी संजीवनी समितीच्या बैठकीत विचार मांडून, कृषी सहाय्यक व समुहा सहाय्यक यांच्याशी संपर्क साधावा. |
| ९ | अमोल पाटील | सर, कागदपत्रे कमीत कमी घेण्यात यावी. | |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | प्रकल्प स्तरावरून निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनानुसार किमान कागदपत्रांची आवश्यकता आहे. मार्गदर्शक सूचना व्यतिरिक्त कागदपत्रांची मागणी होत असल्यास सदरची बाब उपविभागीय कृषि अधिकारी यांच्या निदर्शनास आणावी. याउपरही आपल्या सूचनांचा सकारात्मक विचार करण्यात येईल. |
| १० | ओंकार कोळपे | कृषी ताई च्या नावे शेती असणे आवश्यक आहे का नसेल तर काय करता येईल? कृपया मागदर्शन करावे हि विनंती.<br>-सौ. भुजाडे | कृषीताई च्या नावे शेती असणे आवश्यक नाही. याबाबतच्या मार्गदर्शक सूचना प्रकल्पाचे संकेतस्थळ www.mahapocra.gov.in येथे उपलब्ध आहेत. |
| ११ | संदीप राजूरकर | ट्रॅक्टर सारख्या यांत्रिक बाबींना वैयक्तिक योजनेत घेण्याचा विचार करावा ही विनंती. | ट्रॅक्टर हा घटक प्रकल्पामध्ये वैयक्तिक लाभाच्या बाबीमध्ये समाविष्ट केलेला आहे. याबाबतच्या सविस्तर मार्गदर्शक सूचना प्रकल्पाचे संकेतस्थळ www.mahapocra.gov.in येथे उपलब्ध आहेत. |
| १२ | रघुनाथ सुले | मी मेघा रघुनाथ सुले, नागठाणा, तालुका मूर्तिजापुर, जिल्हा अकोला, येथील कृषी मित्र आहे या खुर्ची मित्ताई चे मानधन मिळत नाही कृषी मंत्री यांनी दखल घ्यावी. | याबाबत कृषी सहाय्यक व समूह सहाय्यक यांच्याशी संपर्क साधावा |
| १३ | आर. सचिन<br>गाव- बालाजीनगर धावंडा<br>तालुका-मानोरा, जिल्हा वाशीम | अर्ज दाखल करून आज आठ महिने होऊन ही कार्यवाही झालेली नाही. | कृपया याबाबत आपण संबधित ग्राम कृषी संजीवनी समितीशी संपर्क साधावा. प्रकल्प स्तरावरूनही याबाबत उपविभागीय कृषि अधिकारी यांना सूचना देण्यात येत आहेत. |
| १४ | जमिरशा टा. खु जमिर<br>टाकडी खुर्द पोस्ट चौहोट्टा बाजार ता अकोट जि आकोला | सर, आम्हाला दीड वर्ष झाले कोणत्याच प्रकारचे अनुदान मिळाले नाही, कृषी ताई | कृपया याबाबत आपण संबधित ग्राम कृषी संजीवनी समितीशी संपर्क साधावा. प्रकल्प स्तरावरूनही याबाबत उपविभागीय कृषि अधिकारी यांना सूचना देण्यात येत आहेत. |
| १५ | ज्ञानेश्वर भोकरे | पुढिल फन्ड्स् कधीपर्यंत उपलब्ध होतील, कृपया मार्गदर्शन करावे. लॉकडाउन चा काही परिणाम होणार आहे काय? | निधी मिळण्यासाठी शासनाकडे प्रस्ताव सादर केलेला आहे. निधी उपलब्ध होताच पुढील अनुषंगिक आवश्यक कार्यवाही तात्काळ करण्यात येईल. |

| | | | |
|---|---|---|---|
| १६ | रघुनाथ सुळे | मी मेघा रघुनाथ साहेबराव सुळे, नागठाणा, माझी नियमाची बाग लागवड केलेल्या मला एक हप्ता मिळाला दुसरा हप्ता मिळाला नाही आहे याची दखल घ्यावी. | याबाबत कृषी सहाय्यक व समूह सहाय्यक यांच्याशी संपर्क साधावा |
| १७ | प्रदीप कराळे | पुर्ण झालेले कामे तीन महीने झाले desk 7 वरती पेंडींग आहेत त्यांचे पेमेंट कधी होणार आहे. | निधी मिळण्यासाठी शासनाकडे प्रस्ताव सादर केलेला आहे. निधी उपलब्ध होताच पुढील अनुषंगिक आवश्यक कार्यवाही तात्काळ करण्यात येईल. |
| १८ | सुषमा पेठे | सर महिला बचत गट साठी नवीन योजना सुरु कराव्यात हि विनंती. | आपल्या गरजेवर आधारित प्रकल्प अहवाल तयार करून आपण ना. कृ.सं. प्रकल्पांतर्गत लाभ घेऊ शकता. कृपया आपण यासाठी आपले जिल्ह्याचे कृषी व्यवसाय विशेषज्ञ यांचेशी संपर्क साधावा. |
| १९ | ज्ञानेश्वर मिसाळ | यवतमाळ च्या कृषी ताईचं हार्दिक अभिनंदन अतिशय सुंदर साध्या भाषेमध्ये शेतकऱ्यांना मार्गदर्शन करतात. | धन्यवाद! प्रकल्प विशेषज्ञ-मनुष्यबळ यांचेमार्फत आपल्या सदभावना त्यांच्यापर्यंत पोहचविण्यात येतील. |
| २० | दीपक पाटील | ठिबक संचाच्या अनुदानामध्ये काही बदल होतील का? | मार्गदर्शक सूचनेनुसार अनुदान देय राहील.काही बदल झाल्यास याबाबतच्या मार्गदर्शक सूचना प्रकल्पाचे अधिकारी तसेच प्रकल्पाचे संकेतस्थळ www.mahapocra.gov.in येथे उपलब्ध करण्यात येतील. |
| २१ | विजय कावरखे गोरेगाव ता.सेनगाव जि.हिंगोली | गावोगाव गोडाऊन योजना प्रभावीपणे राबविणे जरूरी आहे. गोडाऊन योजना ही वैयक्तिक स्तरावर राबविता येईल का? | सध्यस्थिती हि बाब गटांमार्फत राबविण्यात येते. अधिक माहितीसाठी आपले जिल्ह्याचे कृषी व्यवसाय विशेषज्ञ यांचेशी संपर्क साधावा. |
| २२ | पवार ओंकार | आतापर्यंत आम्हाला तुषार संचाचे अनुदान मिळाले नाही. | याबाबत कृषी सहाय्यक व समूह सहाय्यक यांच्याशी संपर्क साधावा |
| २३ | सौरभ | सामुदायिक शेततळे मुदती मध्ये पूर्ण झाले आहेत पण बिल अपलोड न झाल्याने त्यांची पूर्वसंमती रद्द झाली आहे. तर आता काय कारावे. | प्रकल्प स्तरावर याबाबत सकारात्मक विचार करण्यात येत आहे. आपण आपल्या उपविभागीय कृषी अधिकारी यांचेशी संपर्क साधावा. |
| २४ | संगीता दत्तात्रय आगळे, सरपंच, उस्मानाबाद | सबसिडी लवकर मिळावी, कांदाचाळ, पॅकहाऊस वैयक्तिक द्यावीत. | निधी उपलब्धतेनुसार अनुदान अदायगीची कार्यवाही त्वरित केली जाते. सध्यस्थितीत कांदाचाळ, पॅकहाऊस या बाबी गटांनाच देय आहेत. |
| २५ | प्रणाली मयूर पाटील | आता पुर्वसंमती भेटेल का? | निधी उपलब्धतेनुसार याबाबत निर्णय घेऊन प्रकल्पातील अधिकाऱ्यांना अवगत करण्यात येईल. |

| | | | |
|---|---|---|---|
| २६ | तायडे शुभांगी | साहेब 6 तारखे नंतरच्या अर्जांना पूर्वसंमती मिळणार का? | निधी उपलब्धतेनुसार याबाबत निर्णय घेऊन प्रकल्पातील अधिकाऱ्यांना अवगत करण्यात येईल.<br>सदर बाब संचालक, पणन यांचेशी संबधित असून सदरची बाब वरिष्ठ स्तरावरून त्यांचे निदर्शनास आणण्यात येईल. |
| २७ | मीनाताई विजयराव डहाके | माझा प्रश्न मंत्री महोदयाला आहे, आमच्या गावातील कापूस शेतकऱ्यांच्या घरात तसाच पडून आहे आणि त्या कपाशीचा तुम्ही योग्य निर्णय लावावा व या महिण्यात कापूस खरेदी करावा. | |
| २८ | तायडे शुभांगी | रेशीम उद्योगाविषयी महिलांना प्रशिक्षण देण्यात यावे. | रेशीम उद्योगाविषयी प्रशिक्षण देण्याची तरतूद प्रकल्पामध्ये आहे. कृपया आपण आपल्या उपविभागीय कृषि अधिकारी यांचेशी संपर्क साधावा. |
| २९ | कमलबाई गांधीले | नवीन कृषी ताईना ट्रेनिंग कधी मिळणार आहे. | प्रकल्पाच्या संकेत स्थळावर आणि Youtube वर प्रशिक्षणासाठी भरपूर सामग्री उपलब्ध आहेत तसेच पुढील प्रशिक्षणासाठी वेळोवेळी सूचना देण्यात येतील. |
| ३० | सुजाता प्रवीण जाधव | भुमीहीन शेतमजुरांनी शेळीपालनासाठी अर्ज केलेले आहेत त्यांना पुर्व संमतीपण मिळाली आहे पण खरेदी संदर्भात प्रक्रीया पुढे गेलेली नाही. | याबाबत कृषी सहाय्यक व समूह सहाय्यक यांच्याशी संपर्क साधावा |
| ३१ | कमलबाई गांधीले | समूह सहायक आणि कृषी सहायक जर आमच्या प्रश्नाचे उत्तर समाधानकारक देत नसतील तर काय करायला पाहिजे? | आपण आपली ग्राम कृषी संजीवनी समिती, उपविभागीय कृषी अधिकारी किंवा जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांचेशी संपर्क साधावा. |